ePaper
# ब्रिजभूषण सिंह यांच्यावर पॉक्सोसह आणखी एका कलमांतर्गत गुन्हा दाखल



वर्ष - 7 । अंक - 3 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत
- 'रेरा'नुसारच म्हाडाने सुविधा द्यावी!
- शाहरुख खान टोळीला 'मोक्का'
- बॅनरबाजांना भावी मुख्यमंत्र्यांनी खडसावले!

www.mahaenews.com | ।शनिवार दि. 29 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# राजकीय अघोरींना एकोप्याचा 'जगतापी उतारा'!

## जगताप कुटुंब अभेद्य : अल्पसंतुष्टांच्या महत्त्वाकांक्षांवर पाणी



दोन दिवसांपूर्वीच, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत चिंचवड मतदार संघातील विविध नागरी समस्या व रखडलेले प्रकल्प प्रलंबित कामाबाबत आमदार अश्विनी जगताप यांनी सर्व माजी नगरसेवकांसह आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत आढावा बैठक घेतली. या बैठकीला चिंचवड विधानसभा भाजपा निवडणूक प्रभारी शंकर जगताप अग्रभागी उपस्थित होते. त्यामुळे अल्पसंतुष्टांच्या भुवया उंचावल्या आहेत, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

।पिंपरी महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदार संघातील जगताप कुटुंबामध्ये दुही निर्माण करुन, राजकीय स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या अल्पसंतुष्ट राजकीय प्रवृत्तींना एकसंध जगताप घराण्याने चांगलीच चपराक दिली आहे.**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीच्या निमित्ताने दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचा उत्तराधिकारी कोण? अशी चर्चा शहराच्या राजकारणात हेतुपुरस्सर घडवून आली. त्यात भाजपामधील काही अल्पसंतुष्ट आणि महाविकास आघाडीतील महत्त्वाकांक्षी लोकांनी फुंकर घातली. त्याद्वारे जगताप कुटुंबामध्ये दोन गट निर्माण झाल्याचे भासवण्यात आले. मात्र, या पोटनिवडणुकीत 'जगताप पॅटर्न' यशस्वीपणे राबवून विजयश्री खेचून आणत अनेकांचे मनसुभे उधळून लावले.

दरम्यान, अश्विनी जगताप आणि शंकर जगताप यांच्यात मतभेद आहेत. त्यामुळे २०२४ ला मोठे वादळ निर्माण होणार असून, त्याचा परिणाम मतदार संघातील विकासकामांवर होणार आहे, असा 'नॅरेटिव्ह सेट' करण्यासाठी एक विशिष्ट यंत्रणा




कामाला लागली होती. 'झारीतील शुक्राचार्यां'चा हा डाव ओळखून जगताप कुटुंबाने राजकीय आणि कौटुंबिक समंजसपणा दाखवत आपला एकोपा आणखी मजबूत केला आणि त्याद्वारे चिंचवडमधील बालेकिल्ला अभेद्य ठेवला. त्यामुळे अनेकांची अस्वस्थता वाढली आहे.

### अतिमहत्त्वाकांक्षी लोकांची विमाने जमिनीवर!

» विद्यमान आमदार अश्विनी जगताप आणि भाजपाचे चिंचवड विधासभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांच्यात मतभेद असल्याचे चित्र उभा करुन अघोरी आनंद घेणाऱ्या पुरेपूर प्रयत्न पुरता फसला. जगताप कुटुंब अभेद्य असून, अघोरींना आमच्या एकोप्याचा निश्चितपणे 'जगतापी उतारा' असेल, असा सूचक इशाराच या बैठकीतून जगताप कुटुंबियांनी दिला आहे.

» विशेष म्हणजे, या बैठकीला अपवाद वगळता भाजपाचे सर्व माजी नगरसेवक जातीने उपस्थित होते. त्यामुळे भाजपात दुही निर्माण होवून चिंचवडमध्ये राजकीय पोळी भाजेल, अशा भ्रमात असलेले अतिमहत्त्वाकांक्षी लोकांची विमाने जमिनीवर आली आहेत, असा दावा दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचा सर्वसामान्य कार्यकर्ता, समर्थकांमधून केला जात आहे.

### शंकर जगताप 'डिसिझन मेकर' नेतृत्व...

» चिंचवड विधानसभा मतदार संघात निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांच्या रुपाने भाजपाला उच्चशिक्षीत आणि प्रोफेशनल नेतृत्व मिळाले आहे. महापालिका कामकाजाचा अनुभव आणि व्यावहारिक जाण असल्यामुळे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या हयातीतच त्यांच्याकडे पक्ष संघटना आणि मतदार संघातील कामाची जबाबदारी पडली होती. त्यामुळे जुने-नवे आणि नाराज अशा सर्वांची मोट बांधत चिंचवडमध्ये शंकर जगताप यांनी मैदान मारले.

» विशेष म्हणजे, महापालिका प्रशासनामध्ये दिवंगत जगताप यांच्याप्रमाणेच शंकर जगताप यांचा 'शब्द' अंतिम मानला जात आहे. आमदार अश्विनी जगताप आणि शंकर जगताप यांनी घेतलेली आयुक्तांसोबतची बैठक आणि या बैठकीला उपस्थित असलेले सर्व इच्छुक माजी नगरसेवक हे चित्र पाहता आगामी काळात शंकर जगताप हेच 'डिसिझन मेकर' नेतृत्व म्हणून प्रभावी ठरतील, असे स्पष्ट संकेत आहेत.







# ‘रेरा’नुसारच म्हाडाने सुविधा द्यावी!

## » तळेगाव दाभाडे प्रकल्पातील किंमती वाढल्या : लाभार्थींचा मुख्याधिकाऱ्यांना घेराव

। पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे गृहनिर्माण मंडळातर्फे (म्हाडा) तळेगाव दाभाडे येथील प्रकल्पाची २०१६ ची सोडत काढण्यात आली. सोडतीच्या जाहिरातीत घराची किंमत १४ लाख रुपये होती. मात्र; अचानक ‘म्हाडा’ने अडीच लाख रुपये वाढवून १६ लाख ५० हजार रुपये किंमत केली आहे. संबंधित लाभार्थी सदनिकाधारकांनी पुणे म्हाडा कार्यालयात अधिकाऱ्यांना घेराव घातला आणि जाब विचारला. या पार्श्वभूमिवर तळेगाव दाभाडे म्हाडा सदनिका धारकांनी पुणे म्हाडा मुख्याधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे रेरा कायद्यानुसार म्हाडाने सुविधा द्याव्यात तसेच तळेगाव दाभाडे प्रकल्पातील वाढीव किंमती रद्द कराव्यात अशा विविध मागण्या केल्या आहेत.**




या गृहनिर्माण योजनेत ७९६ घरे आहेत. ‘म्हाडा’तर्फे २०१६ ची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात बांधकाम सुरू असलेल्या सुमारे ३०.६७ चौरस मीटर सदनिकेची किंमत १४ लाख रुपये नमूद केली होती. ती आता सुमारे १६ लाख ५० हजार रुपये केली आहे. यावर ‘म्हाडा’ने नमूद केले की, रेरा, जीएसटी, पार्किंग, पाण्याचा भार, वाढलेले बांधकाम साहित्याचे भाव, वाढलेले मजुरीचे दर आदींमुळे सदनिकेच्या किमतीत वाढ झाली आहे.

म्हाडाच्या मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवदेनात सदनिकाधारकाने म्हटले आहे की, सदनिका फ्लॅट धारक रेरा नियमाप्रमाणे मुदतीत ताबा मिळावा. सदरची योजना आर्थिक मागास वर्गीय यांच्यासाठी आहे. केंद्र सरकारकडून ही त्यास पाठिंबा आहे. अगोदरच गृह कर्जाचे हप्ते आणि मी सध्या राहत असलेल्या माझ्या घराचे भाडे भरून मला आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत असल्याकारणाने मला खूप जड जात आहे. महा रेरा मुदती प्रमाणे ३०/०६/२०२३ पर्यंत मला माझा घराचा ताबा देण्यात यावा. किंवा ताबा मिळेपर्यंत घरभाडे मिळावे.

तसेच दिनांक २३/०४/२०२३ रोजी तळेगाव साईट वरती झालेल्या सदनिका फ्लॅट धारकांच्या बैठकीत काही मुद्द्यांवरती खुलासा करण्यात यावा, अशीही निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

### सदनिकेच्या किमतीत वाढ

» “म्हाडा’तर्फे २०१६ ची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात बांधकाम सुरू असलेल्या सुमारे ३०.६७ चौरस मीटर सदनिकेची किंमत १४ लाख रुपये नमूद केली होती. ती आता सुमारे १६ लाख ५० हजार रुपये केली आहे. यावर ‘म्हाडा’ने नमूद केले की, रेरा, जीएसटी, पार्किंग, पाण्याचा भार, वाढलेले बांधकाम साहित्याचे भाव, वाढलेले मजुरीचे दर आदींमुळे सदनिकेच्या किमतीत वाढ झाली आहे.

### ‘खुलासा करावयासाठीचे मुद्दे...

१) प्रती इमारत नुसार म्हाडा कार्यालयाने बनवलेल्या व्हॉटस् अप ग्रुपवरती कोणाच्या ही नावे नसलेले एक सुधारित रक्कम 2.50 लाख रूपये दराबाबत आणि गॅलरी वाढीव एरीयाबाबत पत्रक पोस्ट केले आहे. त्याबाबत कोणताही सदनिका फ्लॅटधारक 2.50 लाख रूपये भरण्यास तयार नाही. कारण वाढीव एरीयाबाबत आपण आमच्या कुठल्याही फ्लॅट धारकास ही पूर्व कल्पना न देता आपण आपल्या मर्जीप्रमाणे हा निर्णय घेऊन आमच्या सर्व फ्लॅट धारकांच्या माथी मारण्याचा प्रयत्न आमच्या बाबतीत करत आहे. ते आम्हा सर्वांना अजिबात मान्य नाही. सर्वात महत्वाची बाब म्हणजे गॅलरी ही पहिल्या पासूनच होती आणि आहे सॅम्पल फ्लॅट मध्ये सुध्दा ती गॅलरी आणि एरीया तेवढाच आहे. गॅलरीशिवाय बिल्डिंग होऊच शकत नाही इमारत बांधकाम नियमानुसार या बाबतीत सुद्धा म्हाडाने आपले मत स्पष्ट करावे.

२) इमारत तयार होण्यास विलंब होत असल्याने इतर म्हाडा स्किमला शेवटचा हप्ता माफ करण्यात आला तसे आम्हाला सुद्धा शेवटचा हफ्ता पूर्णपणे माफ करणे किंवा 10% रक्कम कमी करणे बाबत निर्णय व्हावा.

३) संपूर्ण योजना महारेरा नियमा नुसार वेळेत ताबा देऊ शकणार नसेल तर सदनिका फ्लॅट धारकांना भाडे पोटी रक्कम देण्यात यावी या विषयी खुलासा व्हावा.

४) मुद्रांक शुल्क आणि दस्त नोंदणी साठी फक्त अक्षरी रूपये एक हजार फक्त (1000) लागणार आहेत, असे आपण सोडतीत नमुद केले आहे. तरी या व्यतिरिक्त इतर काही त्यात छुपे खर्च नसावेत याबाबत खुलासा करणे.

५) संपूर्ण योजनेला पुढे पाणी प्रश्न येऊ नये. यासाठी थेट नविन पाईपलाईनव्दारे पाणी पुरवठा करण्यात यावा. याबाबत काय उपाय योजना म्हाडाने केल्या आहेत का याचा खुलासा करणे.

६) सदनिकाचा ताबा देताना तेथे राहायला येणाऱ्या कुटुंब मधील पाल्यांचा शिक्षणाच्या सत्रचा विचार करावा जेणे करून त्यांचे शैक्षणिक आणि पालकांचे आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी घेऊन निर्णय देणे बाबत.

७) गृह कर्जाच्या नियमानुसार ९०% बांधकाम पूर्ण होऊन खरेदी खत किंवा करार (अग्रिमेन्ट) होत नाही. तोपर्यंत बँक पुढील हप्ता देणेस तयार नाही. तरी याची पूर्तता आपण कशा प्रकारे करणार आहात याविषयी खुलासा व्हावा.

# शाहरुख खान टोळीला ‘मोक्का’!

## वाकड पोलिसांची कारवाई : संघटित गुन्हेगारीला आता लगाम

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**वाकड पोलिस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार शाहरुख युनूस खान याच्या टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या टोळीवर अनेक प्रकारचे गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. वाकड पोलिसांनी ही कारवाई केली आहे.**





शाहरुख युनूस खान (वय २९) विकास उर्फ बाळा विकास लोखंडे (वय २६) आनंद किशोर वाल्मिकी (वय २८) जुबेर युनूस खान ( वय २२) व्यंकटेश उर्फ विष्णू धर्मा कांबळे (वय २१) यांच्या विरुद्ध खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, दरोडा घालणे, जबर दुखापत करून जबरी चोरी, साधी दुखापत, खंडणी मागणे, गैरकायद्याची मंडळी जमवून खुनाचा प्रयत्न करणे, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणे व बेकायदेशीररित्या घातक शस्त्रे जवळ बाळगणे असे एकूण १९ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

ही कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त मनोज लोहिया, अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे). डी. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२ पद्माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पी.सी.बी. गुन्हे शाखा सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस तसेच अमलदार सचिन चव्हाण, व्यंकट कारभारी, गुन्हे शाखा पी की सुहास पाटोळे, वाकड पोलीस ठाणे यांचे पथकाने केली आहे.

### आतापर्यंत 526 आरोपींवर मोक्का...

**पिंपरी चिचवड शहरातील वाकड, सांगवी व हिंजवडी पोलीस ठाण्यात दाखल असल्याचे तसेच वरील सर्व आरोपींनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वापर करून वर्चस्वासाठी व आर्थिक संघटित गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार वरिष्ठ पोलिसांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, सन २०२३ मध्ये पिंपरी पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील ०९ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील एकूण ५२६ आरोपींवर मोका कायद्याअंतर्गत कारवाई केलेली आहे.**

# पुण्यातील बैठकीवरुन दोन दादांमध्ये जुंपली!

## अजित पवार - चंद्रकांत पाटील आमनेसामने

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।



पुणे शहर आणि ग्रामीण भागातील पाणी नियोजनाबाबत कालवा समितीची बैठक पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसापूर्वी झाली.पण या बैठकीला विरोधी पक्षनेते अजित पवार उपस्थित नव्हते.त्यामुळे अजित पवार नेमके कुठे गेले.या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले होते.पण या बैठकीच्या ठिकाणी चंद्रकांत पाटील हे येताच अधिकाऱ्यांना विचारले की, दादा आले आहेत का ? त्यावर अधिकारी म्हणाले, दादा आले नाही.अजितदादा पुन्हा गायब झाले का ? अस विधान चंद्रकांत पाटील यांनी त्यावेळी केले होते.ते विधान सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले.

त्या बैठकीला अनुपस्थित राहण्याबाबत अजित पवार म्हणाले की, पुणे शहर आणि ग्रामीण भागातील पाणी नियोजनाबाबत कालवा समितीच्या बैठकीबाबत मला पहिल्यांदा सांगण्यात आल की, ती बैठक दहा वाजता होणार, त्यानंतर अकरा वाजता आणि पुन्हा बारा वाजता बैठक होणार असल्याच सांगण्यात आले. पण त्याच दिवशी मुंबईत दुपारी तीन वाजता शरद पवार यांच्या सोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळेनुसार मी बैठकीला उपस्थित होणार होतो. त्याबाबतची कल्पना शरद पवार यांना दिली होती. तसेच मी देखील पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री राहिलो असून माझ्या कामाची पद्धत पुणे जिल्हय़ातील नागरिकांनी पहिली आहे.माझी बैठक सात म्हणजे सात इकडे तिकडे पाच मिनिट कधीच होऊ दिले नाही.ही आपल्या कामाची पद्धत आहे.पण दादांना (चंद्रकांत पाटील) खूप मोठ्या प्रमाणावर व्याप आहे.त्यामुळे त्यांच्या वेळा पुढे पुढे ढकलल्या जात आहेत आणि पुन्हा तिथे येऊन दादा (अजित पवार) नॉट रिचेबल म्हणाता,आहो दादा तर रिचेबल होता. मी दादासाठी धावपळत आल्याचे म्हणता ते मी पाहत होतो. तरी देखील ते उशिराच आले.असा टोला अजित पवार यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना लगावला.

तसेच ते पुढे म्हणाले की, मुंबईतील बैठकीमुळे कालवा समितीच्या बैठकीला उपस्थित राहू शकत नसल्याचे माझ्या व्यक्तीने चंद्रकांत पाटील यांना त्याचवेळी सांगितले अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली.

# महापालिका हद्दीतील ‘त्या’ गावांची पायपीट थांबणार!

## पिंपरी-चिंचवड भूमि अभिलेख कार्यालयाशी संलग्न करण्याची मागणी

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील काही गावे हवेली भूमि अभिलेख कार्यालयाशी सल्लग्न आहेत. त्यामुळे शासकीय कामासंदर्भात ग्रामस्थांना पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे आगामी काळात संबंधित गावे पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाशी सल्लग्न करावीत, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

याबाबत राज्याचे महसूल व दूग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, तहसील हवेली कार्यालयातील काही गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील काही गावे यापूर्वी हवेली तहसील कार्यालय अंतर्गत येत होती. मागील काही कालावधीमध्ये सदर गावे अभिलेख सहीत पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाअंतर्गत संलग्न करण्यात आलेली आहेत.





त्याचप्रमाणे भूमी अभिलेख हवेली कार्यालयाअंतर्गत काही गावे पिंपरी-चिंचवड या कार्यालयाशी संलग्न करण्यात यावीत.

पिंपरी-चिंचवड मनपातील नागरिकांना जमीन मोजणीकरिता तसेच ‘प्रॉपर्टी कार्ड’ या कामासाठी हवेली भूमिलेख कार्यालयामध्ये जावे लागते.

त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि खर्चही वाढतो आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील नागरिकांना शहरातच सुविधा मिळणे सोयीचे होणार आहे. त्यानुसार, बोपलेख, दिघी, वडमुखवाडी, चऱ्होली, चोवीसवाडी, डूडूळगाव, मोशी, चिखली, देहु, किन्हई, रावेत, मामुर्डी, किवळे इ. गावे नगर भूमापन अभिलेख पिंपरी-चिंचवड कार्यालयाशी संलग्न करण्यात यावीत, अशी आमची आग्रही मागणी आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

> **पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील समाविष्ट गावांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले आहे. गावे हद्दीत समाविष्ट झाली, त्याचवेळी भूमि अभिलेख कार्यालयाबाबत विचार होणे अपेक्षीत होते. आज अनेक भूमिपूत्र नागरिकांना जमीन मापन किंवा प्रॉपर्टी कार्डच्या बाबतीत हवेली कार्यालयाकडे पायपीट करावी लागत आहे. याबाबत महसूल मंत्र्यांकडे मागणी केली आहे. त्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, असा विश्वास आहे.**
>
> - **महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## संपादकीय »

### अम्हांस आम्ही पुन्हा पहावे...

***आर्थिक आघाडीवर नजीकच्या काळात भारत लक्षणीय प्रगती करेल, अशी चिन्हे आहेत. मनावर दडपण नसणारी आणि तंत्रज्ञानाच्या लाटेवर आरूढ झालेली आजची तरुणाई हे नव्या भारताचे आशास्थान आणि बलस्थान आहे! लोकसंख्यावाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची, आव्हानांची चर्चा करताना सकारात्मक बाबींकडे डोळेझाक होऊ नये.***

भारत सर्वाधिक लोकसंख्येचा देश झाल्याची बातमी आल्यानंतर उमटलेल्या बहुतांश प्रतिक्रियांचा सूर नकारात्मक दिसून आला. त्यामुळे या विषयाकडे नव्याने बघण्याची आवश्यकता आहे, हे जाणवले. शहरांमधील वाढती लोकवस्ती, पायाभूत सुविधांचे प्रश्न, वाहतूक कोंडीच्या वाढत्या समस्या, पाणीपुरवठा, वीज यांच्या पुढील काळात वाढणाऱ्या गरजा कशा पूर्ण होणार, या शंका रास्त आहेत. वाढत्या शहरीकरणाकडे पाहताना कायदा-सुव्यवस्था, नागरी सेवा यांमध्ये प्रशासनापुढे असणारी आव्हानेही समोर येतात. पण या विषयाच्या दुसऱ्या आणि सकारात्मक बाजूकडेही मोकळ्या मनाने बघणे जरुरीचे आहे. लोकसंख्येच्या बातमीइतकीच महत्त्वाची बातमी म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या निकषावर ब्रिटनला मागे टाकून भारताने जगातील पाचव्या क्रमांकाचा मान पटकावला. भारताच्या आर्थिक वाढीचा दर १९८०च्या दशकात चार टक्क्यांच्या घरात होता. त्याची "हिंदू रेट ऑफ ग्रोथ" म्हणून पाश्चात्त्य देश अवहेलना करीत. या सुमारास चीनने आर्थिक सुधारणांचा स्वीकार केला. साम्यवादी धोरणे आमूलाग्र बदलून परकी गुंतवणूक आणि निर्यातीची कास धरली. 'आशियाई वाघ'ही तडफेने प्रगती करताना दिसले. भारत मात्र या स्पर्धेत भारत उशिरा उतरला; पण तरीही १९९० च्या दशकात ५.५%, तर २०००-२०१० च्या दशकात ७% वाढीचा दर भारताने गाठला. गेल्या १२ वर्षांत परकी चलनाची समस्या, थकित- बुडित कर्जाचा प्रश्न आणि कोविड-१९चे महासंकट यांचा सामना करून आर्थिक वाढीचा दर ६.५% पर्यंत राखण्यात भारताने यश मिळविले. जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असणारा जर्मनी व तिसऱ्या क्रमांकावर असलेला जपान यांचा गेल्या दशकातील वाढीचा दर नगण्य आहे. मंदीचे सावट असताना जर्मनी व जपानची आर्थिक वाढ सुधारण्याची अपेक्षा नाही. भारताची वाढ सहा टक्के झाली, तरी येत्या सात वर्षांत या दोन्ही देशांना मागे टाकून जगात तिसऱ्या क्रमांकावर भारत पोचणार, याची खात्री आहे. अर्थात, एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या समीकरणाइतकेच महत्त्व दरडोई उत्पन्नाला दिले पाहिजे.

# केसीआरचे वाढते आकर्षण




**तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि भारत राष्ट्र समिती या पक्षाचे संस्थापक के. चंद्रशेखर राव यांचे महाराष्ट्रात दौरे वाढले आहेत. मराठवाड्यात त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांची पहिली मोठी सभा नांदेडला झाल्यावर परवा संभाजी नगरला झालेल्या दुसऱ्या सभेला सुद्धा दखल घ्यावी असा जबरदस्त प्रतिसाद मिळाला आहे.**

किमान दीडलाख लोक या सभेला उपस्थित होते असा पोलिसांचा आकडा आहे. भाजप सरकार असताना पोलीस जर एवढा आकडा सांगत असतील तर तो नक्कीच दाखवला त्यापेक्षा जास्त असला पाहिजे असा अंदाज बांधायला हरकत नाही. केसीआर यांनी फार लवकर महाराष्ट्र टार्गेट करून बरेच मासे गळाला लावले आहेत. माजी खासदार हरिभाऊ राठोड,राष्ट्रवादी किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष शंकर अण्णा धोंडगे,माजी आमदार माने ,ज्ञानेश वाकुडकर,मराठा नेते प्रदीप सोळुंखे ,माजी आमदार हर्षवर्धन जाधव असे असंख्य मोहरे त्यांना मिळाले आहेत. विदर्भ,मराठवाड्यातील शेतकरी संघटना तर अर्ध्यपेक्षा जास्त केसीआर यांच्या कडे आकर्षित झाल्याचे दिसत आहे.

तेलंगणाच्या केसीआर यांच्या जाहीर सभांना महाराष्ट्रात प्रतिसाद मिळतो याचा अर्थ आपल्याकडील राजकीय पक्षांनी जनतेचा हिरमोड केला आहे. एवढे पक्ष आणि नेते इथे असताना लोकांना तेलंगणातील नेत्याचे आणि त्या सरकारने तिथे केलेल्या कामाचे कौतुक वाटत असेल तर या घडामोडी प्रमुख पक्षांसाठी धोक्याची घंटा ठरू शकतात हे लक्षात घ्यायला हवे. संभाजी नगरच्या सभेत केसीआर यांनी या राज्यातील आगामी सर्व निवडणूक लढण्याचे घोषित केले आहे. असे झाले तर प्रामुख्याने मराठवाड्यात मोठा फरक पडू शकतो. काळात जिल्हा परिषद आणि नगर पालिकेत भारत राष्ट्र समितीचे सदस्य विराजमान होऊ शकतात असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही . केसीआर तेलंगणाचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री आहेत याचा अर्थ निवडणुका कश्या जिंकल्या जातात याचे गणित त्यांना कळले आहे. त्यांनी आपल्या राज्यात शेतकरी आणि दलित योजनांवर ज्या पद्धतीने काम करून अनेक राज्यांचे लक्ष वेधून घेतले आहे त्याचा अभ्यास इतर पक्षांनी करण्याची गरज आहे.

केसीआर राजकीय अभ्यासक आहेत . लोकांची नाडी ओळखण्याचे कसब त्यांना जमले आहे. त्यासाठी त्यांनी तेलंगणा राष्ट्र समिती हे प्रदेशवाचक नाव हटवून पक्षाला व्यापक स्वरूप देण्यासाठी काही महिन्यांपूर्वी भारत राष्ट्र समिती असे आपल्या पक्षाचे नामांतर करून घेतले आहे. केंद्र सरकार आणि प्रामुख्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करीत भाजप विरोधात सर्वांनी एकत्र येऊन लढा देण्याच्या बाजूने त्यांनी कामही आहे. महाराष्ट्रात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी " अब की बार ,किसान सरकार " ही आकर्षक टॅग लाईन वापरून मराठी शेतकऱ्यांच्या दुखत्या नशीवर बोट ठेवले आहे. महाराष्ट्रात आजवर शेतकऱ्यांच्या नावाने जयघोष करीत त्यांचे शोषण कसे झाले याची अतिशय अभ्यासपूर्व मांडणी केसीआर इथे येऊन करतात तेव्हा शेतकरी आणि सामान्य मतदारांना ते थोडेफार पटायला लागले आहे. निवडणूक लढायला लागणारा सगळा दारुगोळा सध्या त्यांच्या भात्यात आहे.

गेल्या काही महिन्यात केसीआर यांच्या सरकारने तेलंगण राज्यात दलित,आदिवासी,शेतकरी,महिला बचत गट,विद्यार्थी आणि नव्या उद्योजकांसाठी काय काय केले याची माहिती देणाऱ्या पानभर जाहिराती मराठी वृत्तपत्रात देऊन वातावरण निर्मिती करून लक्ष केंद्रित करून घेतले आहे. हा त्यांच्या नियोजनाचा उत्तम भाग म्हणावा लागेल. अनेक माजी आमदार,माजी नगरसेवक आणि असंख्य नेते अचानक इथले पक्ष सोडून या नव्या पक्षात कसे काय जात आहेत याचे नवल वाटणे स्वाभाविक आहे ,कदाचित तेलंगणातील सत्तेचा थोडाफार लाभ काही नेत्यांना मिळाला असेल मात्र सगळ्यांना पैसे देऊन दखलपात्र गर्दी करणे शक्य नसते. केसीआर यांनी गेल्या दोन महिन्यात महाराष्ट्रातील अनेक शेतकरी आणि युवक नेत्यांना हैद्राबादला निमंत्रित करून सरकारचे प्रत्यक्ष काम बघण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्याचाही मोठा परिणाम सध्या दिसत आहे.

**संपूर्ण महाराष्ट्र १९७२ मध्ये दुष्काळाने होरपळत होता. याचा सर्वात जास्त फटका बसला तो ग्रामीण भाग आणि शेतकऱ्यांना. याच दुष्काळामुळे मात्र शेतकरी ,कामगार आणि इतरही निगडित वर्गांनी आंदोलन छेडले; कारण हाताला काम असल्याशिवाय कोणतीही अर्थव्यवस्था वा घर चालवणे शक्यच नाही. त्यामुळे दुष्काळामुळे हवालदिल झालेल्या शेतकरी व कामगार वर्गाला उदरनिर्वाहासाठी काम असणे ही आवश्यकता बनली होती.**

## लढा सन्मानानं जगण्याचा



या सगळ्या पार्श्वभूमीवर १९७२ मध्ये देशातील पहिली "रोजगार हमी योजना" महाराष्ट्रात अंमलात आणली गेली. हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांनी या योजनेची पायाभरणी केली आणि रोजगार नसलेल्या हातांना वर्षातील ठरावीक दिवस काम देऊन त्या बदल्यात रोख रक्कम किंवा अन्नधान्य देण्यास सुरुवात झाली. स्वतंत्र भारतात १९६० मध्ये सर्वप्रथम कम्युनिस्ट चळवळीने कामगारांच्या हक्काचा आणि रोजगाराच्या अधिकाराचा मुद्दा उचलून धरला. मात्र त्यानंतरच्या कामगार चळवळींमध्ये हा मुद्दा बाजूला राहिला आणि पुन्हा प्रकाशात आला १९७२ मध्ये जेव्हा महाराष्ट्रात रोजगार हमी योजना राबवण्यात आली.

स्वातंत्र्यसेनानी व विधानपरिषदेचे माजी अध्यक्ष वि. स. पागे यांच्या प्रयत्नांतून रोजगार हमी योजना जन्मास आली. १९६५ मध्ये सांगली जिल्ह्यामधील तासगाव तालुक्यातील विसापूर गावामध्ये सर्वप्रथम रोजगार हमी योजना प्रायोगिक स्वरूपात राबवण्यात आली. १९७२ च्या तीव्र दुष्काळाच्या परिस्थितीत १ एप्रिल १९७२ पासून महाराष्ट्रभर रोजगार हमी योजना अमलात आली. १९७७ मध्ये 'मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम' या तत्त्वावर आधारित रोजगार हमी अधिनियम अस्तित्वात आले.

ग्रामीण भागातील जनतेला कामाची हमी हवी. ग्रामीण श्रमजीवी जनतेच्या चळवळीतून या योजनेचा जन्म झाला. ' काम करण्याचा हक्क ' नागरिकास देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. बेरोजगारी निर्मूलन हे या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य होते. दुष्काळ पीडित जनतेला प्रतिष्ठेने जीवन जगण्याचा दिलासा मिळाला. महाराष्ट्राने ही योजना बरीच वर्षे चालवली. या योजनेचे अनुकरण नंतर आंध्र प्रदेश सरकारने केले.

भारतीय राज्यघटनेतील राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वांमध्ये, रोजगाराचा अधिकार समाविष्ट करण्यात आला आहे. अनुच्छेद ४१ अंतर्गत या अधिकाराची पुष्टी करण्यात आली. परंतु हा अधिकार मूलभूत अधिकार नसल्या कारणाने नागरिकांना न्यायालयात या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी जाता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने काही निकालांमधून रोजगाराच्या अधिकाराला मूलभूत अधिकाराच्या कक्षेत आणले.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बॅनरबाजांना भावी मुख्यमंत्र्यांनी खडसावले!

## माझ्या सासुरवाडीचं फारच प्रेम उतू चाललंय; अजितदादा संतापले

।पुणे ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आणि विरोधी पक्षनेते अजित पवार पुढचे मुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चांना जोर आला आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि कार्यकर्त्यांकडून असा प्रचार सुरू झाल्याने अनेक ठिकाणी भावी मुख्यमंत्री म्हणून अजित पवारांचे बॅनर लागले आहेत. यावरून अजित पवारांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना आवाहन केलं आहे. आज ते पुण्यात पत्रकारांशी बोलत होते.**

असे बॅनर्स अजिबात लावण्यात येऊ नये. आमच्या कार्यकर्त्यांच्या चुकीच्या पद्धतीची अपेक्षा आहे. असे बॅनर लावून



कोणीही मुख्यमंत्री बनत नसतं. त्यासाठी १४५ ची मॅजिक फिगर लागते. एकनाथ शिंदेंनी वेगवेगळ्या कृल्प्त्या वापरून मॅजिक फिगर मिळवली. कोणालाच वाटलं नव्हतं ते मुख्यमंत्री बनतील. परंतु, मी तर सगळ्यांना आवाहन करतो, माझ्या राष्ट्रवादीतील नेते, कार्यकर्ते आणि हितचिंतकांना. सासुरवाडीमध्ये माझ्यावर प्रेम उतू चालणाऱ्या सहकाऱ्यांनाही आवाहन करतो की अतिशय चुकीचा आग्रह आहे. आपआपलं काम करा. आमदारांची संख्या वाढवा, तुमच्या विचारांचे आमदार निवडून आले, वरिष्ठांचे आशीर्वाद लाभले आणि आमदारांनी पाठिंबा दिला तर होऊ शकतं, असं अजित पवार म्हणाले.

### बारसूबाबत स्पष्ट केली भूमिका

**»बारसू येथील रिफायनरीला विरोध करण्यासाठी नागरिकांनी ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. त्या आंदोलकावर लाठीचार्ज झाल्याची घटना घडली आहे. त्या प्रश्नावर अजित पवार यांनी भूमिका मांडली. यावेळी अजित पवार म्हणाले की, "बारसू येथील रिफायनरी प्रकल्पाबाबत पालकमंत्री उदय सामंत यांनी शरद पवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. तसेच माझे देखील उदय सामंत यांच्यासोबत बोलणे झाले आहे. त्या प्रकल्पामुळे तेथील गावांचा किंवा पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. अनेकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, याबाबत उदय सामंत यांनी सांगितले आहे. पण तेथील नागरिक जर विरोध करत असतील तर त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. त्यामुळे शंकांचे निरसन होईपर्यंत सर्वेक्षण थांबवले पाहिजे", अशी माझी भूमिका आहे. तसेच "गरज पडल्यास मी देखील आंदोलनकर्त्यांची भेट घेण्यास जाईल", अशी भूमिका देखील त्यांनी मांडली.**

### काय आहे प्रकरण?

राष्ट्रवादीचे नेते अजित पवारांनी मुख्यमंत्री होण्याची इच्छा बोलून दाखवतात तेरई गावात अजित पवार राज्याचे भावी मुख्यमंत्री असे बॅनर झळकले आहेत. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचं माहेर धाराशिव आहे.

अजित पवार यांनी मुख्यमंत्री होण्याची इच्छा बोलून दाखवताच त्यांच्या सासुरवाडीच्या ग्रामस्थांनी संत गोरोबाकाकांना साकडं घातलं आहे. अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत म्हणून हे साकडं घालण्यात आलं आहे.

### "गौतमी पाटील बैलासमोर नाचेल नाहीतर..."

»राज्यात यात्रा, वाढदिवसनिमित्त नृत्यांगणा गौतमी पाटील हीच्या डान्स शोचे आयोजन करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात गौतमी पाटीलने डान्स केला आहे. डान्सचा तो व्हिडीओ समाज माध्यमावर तुफान व्हायरल होत आहे. याबद्दल पुण्यात प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधीने विरोधी पक्षनेते अजित पवारांना प्रश्न विचारला. त्यावर 'तुला काय वाईट वाटलं. ती बैलासमोर नाचेल नाहीतर आणखी कोणासमोर नाचेल. तुला का त्रास होतोय,' अशी मिश्कील टिप्पणी अजित पवारांनी केली आहे. 'यात्रेत पाटीलबाईला बोलवायचं का रात्री?' या वक्तव्यावरही अजित पवारांनी स्पष्टीकरण दिलं आहे. "अनेक गावांत यात्रा, जत्रा सुरू आहेत. तेव्हा काही ठिकाणी करमणुकीसाठी तमाशे बोलवले जातात. त्यामुळे सध्या गौतमीचं नाव गाजत असून, पाटलीबाईंना आणा, याबद्दल मी सुचवलं होतं. जर त्यांना सुपारी परवडत, असेल तर नक्की बोलवावे," असं अजित पवार म्हणाले.

# काय म्हणता..! महाराष्ट्रातील २० पैकी १३ मंत्र्यांवर गंभीर गुन्हे!

## »भाजपच्या सात तर शिवसेनेच्या सहा मंत्र्यांचा समावेश

। मुंबई।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील २० पैकी १३ म्हणजेच ६५ टक्के मंत्र्यांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती 'एसोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉम्र्स'च्या (एडीआर) अहवालातून पुढे आली आहे.**

'एडीआर'च्या वतीने देशातील २८ राज्यांच्या विधानसभा आणि २ केंद्रशासित प्रदेशातील मंत्रिमंडळाचा अभ्यास करण्यात आला. या अहवालानुसार, महाराष्ट्रातील ६५ टक्के मंत्र्यांवर हत्या, अपहरण, विनयभंग यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. राज्यातील ज्या १३ मंत्र्यांवर 'आयपीसी' अंतर्गत गुन्हे दाखल






आहेत त्यामध्ये महाराष्ट्रात सध्या सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या सात तर शिवसेनेच्या सहा मंत्र्यांचा समावेश आहे.

गंभीर गुन्ह्यांच्या बाबतीत महाराष्ट्रानंतर झारखंड (६४ टक्के), तेलंगणा (५९ टक्के), बिहार (५० टक्के), तमिळनाडू (४८ टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो.

महाराष्ट्रासह देशाच्या अकरा राज्यातील शंभर टक्के मंत्री कोटय़धीश आहेत. विविध राज्यांमधील मंत्र्यांमध्ये सर्वात जास्त संपत्ती असलेल्या पहिल्या १० मंत्र्यांच्या यादीत महाराष्ट्रातील दोन मंत्री आहेत. यात मंगलप्रभात लोढा यांची संपत्ती ४४१ कोटी तर तानाजी सावंत यांची संपत्ती २०६ कोटी इतकी आहे.

### महाराष्ट्रातील तीन मंत्र्यांवर आयपीसी अंतर्गत गुन्हे दाखल आहेत

**»देशातील ९ राज्यांच्या मंत्रिमंडळात एकही महिला मंत्री नाही. देशातील १३१ मंत्र्यांनी (२३ टक्के) पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. १२८ मंत्री (२३ टक्के) पदव्युत्तर पदवीधारक आहेत. देशातील सर्वाधिक २०० मंत्री (३६ टक्के) ५१ ते ६० वयोगटातील, १४३ मंत्री (२६ टक्के) ६१ ते ७० वयोगटातील तर १३९ मंत्री (२५ टक्के) ४१ ते ५० वयोगटातील आहेत.**

# बारसुतील आंदोलन तीन दिवसांसाठी स्थगित!

।राजापूर ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

बारसू रिफायनरी विरोधातलं आंदोलन तीव्र होताना दिसत आहे. प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणजे माती सर्वेक्षणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. यावेळी भू सर्वेक्षण केलं जात असताना आंदोलकांनी त्या ठिकाणी जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी गोंधळाची स्थिती निर्माण झाली. सरकारच्या वेगवेगळ्या आश्वासनांनंतर देखील माती परिक्षण थांबवण्यावर आंदोलक ठाम आहेत.

मात्र आता आंदोलकांनी काही काळ आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. तीन दिवसांमध्ये माती सर्वेक्षण थांबलं नाही तर पुन्हा आंदोलन सुरु करु, असा इशारा देण्यात आलेला आहे. आंदोलक काशिनाथ गोरले यांनी याबाबत माहिती दिली. आंदोलनकर्त्यामध्ये एकवाक्यता झाली असून पुढचे तीन दिवस आंदोलन स्थगित करण्यात आलेलं आहे. यादरम्यान चर्चा करुन तोडगा काढण्याचा निर्णय स्थानिकांनी घेतला आहे. 'एबीपी माझा'ने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.आज पोलिसांकडून आंदोलकांना रोखण्यासाठी बळाचा वापर करण्यात आला. यावेळी महिलांना मारहाण झाल्याचा दावा काही आंदोलकांनी केला आहे. पोलीसांकडून आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न होत असताना देखील आंदोलक त्यांच्या भूमिकेवर ठाम होते. भू-सर्वेक्षणाच्या जागेकडे निघालेल्या महिला आंदोलकांना पोलिसांकडून रोखण्यात आलं. मात्र यानंतर देखील आम्ही पुढे जाणारच अशी भूमिका शेतकरी महिलांनी घेतली. आता आंदोलन स्थगित केल्याची माहिती येत आहे.



# महिला पैलवानांना मोठे यश!

## ब्रिजभूषण सिंह यांच्यावर 2 एफआयआर, पॉक्सोचाही गुन्हा दाखल



।नवी दिल्ली महाईन्यूज।

**जंतर मंतरवर धरने आंदोलनाला बसलेल्या महिला पैलवानांच्या तक्रारीवर अखेर कारवाई करण्यात आली आहे. कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. दिल्लीच्या कॅनॉट प्लेस पोलीस ठाण्यात दोन एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. यापैकी एक पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

भाजपाचे खासदार ब्रिजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाच्या आरोपाखाली एफआयआर नोंदवण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी न्यायालयात दिल्ली पोलिसांनी एफआयआर नोंदवण्याचे आश्वासन दिले होते. सरन्यायाधीश न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती पीएस नरसिम्हा यांच्या खंडपीठासमोर एसजी तुषार मेहता यांनी दिल्ली पोलीस आजच एफआयआर दाखल करतील असे म्हणाले होते.

### "मला मारण्याची धमकी मिळत आहे...

**»भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात कुस्तीगीर पुन्हा आक्रमक झाले आहेत. महिला कुस्तीगिरांच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांच्या चौकशीचा अहवाल सार्वजनिक करणे आणि ब्रिजभूषण सिंह यांना अटक करण्याची मागणी करत कुस्तीगीर जंतर-मंतर मैदानावर आंदोलनाला बसले आहेत. यात विनेश फोगाट, बजरंग पुनिया आणि साक्षी मलिका या कुस्तीगिरांचा समावेश आहे. अशात विनेश फोगाटने मोठा खुलासा केला आहे. 'द वायर'शी बोलताना विनेश फोगाटने सांगितलं, "मला माझ्या कुटुंबाला मारण्याची धमकी देण्यात येत आहे, याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सांगितलं होतं. मुलींना मानसिक त्रास देण्यात येत असून, चुकीचं होत असल्याचं पंतप्रधानांना म्हटलं. तेव्हा पंतप्रधानांनी आश्वासन देत, 'आम्ही इथे बसलो आहोत. तुम्ही काळजी करू नका. आपल्या खेळावर लक्ष द्या,' असं सांगितलं. पण, नंतरही ब्रिजभूषण सिंह यांच्याकडून त्रास देण्यात येत होता."**

### सर्वोच्च न्यायालयावर पूर्ण विश्वास


» सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीनंतर कुस्तीपटूंनी पत्रकार परिषदेत ब्रिजभूषणला अटक होईपर्यंत आपले आंदोलन संपणार नसल्याचे म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयावर आमचा पूर्ण विश्वास आहे. ब्रिजभूषण सिंह यांना सर्व पदांवरून काढून टाकावे, ते त्यांच्या पदांचा गैरवापर करू शकतात. आमचा कोणत्याही समिती किंवा समिती सदस्यावर विश्वास नाही, असे विनेश फोगाट म्हणाली होती.



---

# ज्येष्ठ नागरिकांना सुप्रीम कोर्टाचा झटका!

।नवी दिल्ली। महाईन्यूज।



सर्वोच्च न्यायालयाकडून ज्येष्ठ नागरिकांच्या रेल्वे प्रवास करण्याच्या प्लॅन्सना मोठा धक्का बसला आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या रेल्वे भाड्यात दिली जाणारी सवलत पुन्हा सुरू करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

न्यायमूर्ती एसके कौल आणि न्यायमूर्ती एहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे योग्य नसल्याचे खंडपीठाने म्हटले आहे.

यावर सरकारला निर्णय घ्यावा लागणार आहे. एम के बालकृष्णन यांनी सर्वोच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले की, घटनेच्या कलम ३२ अन्वये या याचिकेनुसार सरकारला आदेश देणे न्यायालयाकरिता योग्य ठरणार नाएमके बालकृष्णन यांनी सर्वोच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली होती, ज्यामध्ये याचिकाकर्त्याने म्हटले आहे की वृद्धांना भाड्यात सूट देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले की, घटनेच्या कलम ३२ अन्वये याचिकेनुसार सरकारला आदेश देणे न्यायालयाला योग्य होणार नाही. ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन आणि त्याचा आर्थिक परिणाम लक्षात घेऊन सरकारला या विषयावर निर्णय घ्यावा लागेल, असे खंडपीठाने सांगितले आणि यासोबतच न्यायालयाने याचिका फेटाळून लावली.ही.कोरोना महामारीच्या वेळी २० मार्च २०२२०पासून ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे भाड्यातील सवलत रद्द करण्यात आली होती आणि ती अद्याप ती पुन्हा सुरू केलेली नाही. अलीकडेच संसदीय स्थायी समितीने ज्येष्ठ नागरिकांसाठी भाड्यात सवलत देण्याची शिफारस केली आहे. मात्र रेल्वे भाड्यातील सवलत पुन्हा देण्यास सरकार नकार देत आहे. रेल्वेमंत्र्यांनी लोकसभेत सांगितले की, २०१९-२० मध्ये ज्येष्ठ नागरिकांना प्रवासी भाड्यात सूट दिल्यामुळे रेल्वेला १६६७ कोटी रुपयांचा महसूल बुडाला आहे. ते म्हणाले की २०१९-२० मध्ये रेल्वेला प्रवाशांच्या तिकिटांवर अनुदान म्हणून ५९,००० कोटी रुपये खर्च करावे लागले.

# मॉरिशसमध्ये घुमला शिवछत्रपतींचा जयघोष !

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण

।मॉरिशस।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारताचे आराध्यदैवत, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचे मॉरिशसमध्ये अनावरण करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची ख्याती जगभर पसरली आहे. ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस आहे, त्या प्रत्येक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा आहे. जगभरातील अनेक देशात छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे आहेत. आता, मॉरिशसमध्ये देशातील सर्वांत मोठ्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मॉरिशसचे पंतप्रधान प्रवींद कुमार जगन्नाथ उपस्थित होते.**



मॉरिशसमधील मराठी समुदायाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. उपस्थित मराठी बांधवांनी पारंपरिक महाराष्ट्र पद्धतीची वेशभूषा केली होती. पुतळ्याचे अनावरण झाल्यानंतर मॉरिशस येथील महाराष्ट्र भवनमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमही पार पडला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित बांधवांशी मराठीत संवाद साधला.

"मॉरिशस हे खरंतर एक लहानसं बेट आहे. महाराष्ट्र प्रदेश भौतिकदृष्ट्या आमच्यापासून कोसो दूर आहे. तरीही महाराष्ट्राची परंपरा, संस्कृती आमच्या नसानसांत वाहत असते. महाराष्ट्र आणि मॉरिशससाठी आज अभिमानाचा दिवस आहे. हा पुतळा भारत सरकारकडून मॉरिशसला भेट देण्यात आला आहे", असे या कार्यक्रमाच्या निवेदनात सांगण्यात आले.

"छत्रपती शिवराय फक्त राजे नव्हते, ते द्रष्टे होते. त्यांनी ज्याप्रमाणे राज्यव्यवस्था घडवली त्यात कोणताही भेद नव्हता. कोणालाही स्पेशल स्टेटस नव्हतं. चूक करणाऱ्यांना शिक्षा होती, चांगलं वागणाऱ्याला प्रोत्साहन होतं", असं यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

"छत्रपती शिवाजी महाराजंनी मराठी माणसाच्या नव्हे तर प्रत्येक भारतीयाच्या मनामध्ये वीरतेचं बीजारोपण केलं, इंग्रज येईपर्यंत मराठा साम्राज्याला कोणी थांबवू शकला नाही. हा महाराष्ट्र धर्म, हिंदवी स्वराज्य प्रत्येकाच्या मनात आजही जिवंत आहे. त्यामुळे ३५० वर्षांनंतर जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मॉरिशसमध्ये उभा राहतो तेव्हा साष्टांग दंडवत घालण्याकरता आम्ही सगळे या ठिकाणी एकत्र आलो आहोत. आज मला या गोष्टीचा आनंद आहे की मॉरिशसमध्ये आल्यानंतर मला मी माझ्या लोकांसोबत आहे, असं मला वाटलं, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# बॉलीवूडच्या सौंदर्यवतींनी रेड कार्पेटवर दाखवला जलवा



68 व्या फिल्मफेअरमध्ये फिल्म स्टार्सचा मेळा आयोजित करण्यात आला होता, जिथे बॉलीवूडच्या सौंदर्यवतींनी रेड कार्पेटवर आपल्या सौंदर्याची झलक दाखवली. बॉलिवूड दिवा आलिया भट्ट, जान्हवी कपूर, रकुलप्रीत, काजोल, हिना खान, स्वरा भास्कर यांच्यासह अनेक अभिनेत्री फिल्मफेअरमध्ये सहभागी होण्यासाठी आल्या होत्या. यावेळी अभिनेत्रींच्या एकापेक्षा एक बोल्ड लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

फिल्मफेअरमध्ये आलिया भट्ट काळ्या ड्रेसमध्ये पोहोचली होती. आलियाने तिचे केस बांधले होते. आलिया भट्टने लॉंग ऑफ शोल्डर गाऊनमध्ये रेड कार्पेटवर सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

तर जान्हवी कपूरने जांभळ्या रंगाच्या गाऊनमध्ये रेड कार्पेटवर एन्ट्री केली होती. अभिनेत्रीने गळ्यात चोकर आणि लॉंग फ्रिल गाउनमध्ये जबरदस्त पोझ दिल्या . या ड्रेसमध्ये जान्हवी खूपच सुंदर दिसत आहे.

# 'मुळशी'करांचा पॅटर्नच वेगळा!

गौतमी पाटील हा विषय दिवसेंदिवस जास्तच गंभीर होत चालला आहे. सर्व मीडियाचे लक्ष तिच्यावर लागले असते. या आधी तिच्या नाचावर, तिच्या हावभावावर बरीच चर्चा झाली, वाद झाले पण गौरमीची क्रेझ काही कमी झाली नाही.आता पुन्हा एकदा तिच्या एका कार्यक्रमातील व्हिडिओ तूफान व्हायरल होत आहे. मुळशीतील एका कार्यक्रमातील हा व्हिडिओ असून हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे.

कारण यावेळी गौतमीच्या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षक नाही तर चक्क एक बैल येऊन उभा आहे. आता हा भन्नाट प्रकार तुम्हीच बघा..लग्न झालं आणि गौतमीची एक अट मान्य नसेल तर ती नवऱ्याला सोडायलाही तयार आहे. त्यामुळे तिच्या या विधानाची भलतीच चर्चा आहे.



गौतमीचे चाहते महाराष्ट्रभर पसरले आहेत. तिच्या कार्यक्रमांना तुफान गर्दी होताना आपल्याला पाहायला मिळत आहे. मात्र आता गौतमी पाटील एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. गौतमीने चक्क बैला समोर नाचतानाचा व्हिडिओ समोर आला आहे.मुळशी तालुक्यात एका नेत्याच्या मुलाच्या लग्नानिमित्त आयोजित मांडव टिळा कार्यक्रमात हा हा व्हिडिओ घेण्यात आल्याचे समोर आले आहे. या कार्यक्रमात गौतमी पाटील नाचत असल्याचे पाहायला मिळतं आहे.कार्यक्रमाचे आयोजक् राजेंद्र हगवणे यांनी सांगितले की, कधीकाळी लग्नात दाराबाहेर मांडव घालण्याची प्रथा होती, त्या मांडवात नवऱ्या मुलाची वाजत गाजत बैलगाडीतून मिरवणूक येत होती. आणि हीच परंपरा कायम ठेवण्यासाठी मिरवणूक न काढता गीतांचा कार्यक्रम ठेवला आणि बैलगाड्याचं प्रतीक म्हणून घरातील बैल कार्यक्रम स्थळी उभा केला.'


# 'गंगूबाई काठियावाडी'ला मिळाले 'हे' पुरस्कार

सध्या बॉलिवूडमध्ये फिल्मफेअर अवॉर्ड चांगलाच चर्चेत आहे. गुरुवारी रात्री हा सोहळा पार पडला. अनेक कलाकारांनी अनेक अवॉर्ड्स जिंकले. अशातच आलिया भट्टच्या 'गंगूबाई काठियावाडी' चित्रपटाने एकूण 6 अवॉर्ड्स पटकावले. ज्यात सर्वोत्कृष्ट अभिनेत्री हा अवॉर्ड्स आलियाने पटकावले. काल पार पडलेला हा सोहळा रात्री 28 एप्रिल रोजी रात्री 9 वाजता कलर्स टीव्हीवर प्रासारित होणार आहे.

68 व्या फिल्मफेअरमध्ये आलियाच्या 'गंगूबाई काठियावाडी'ला मिळाले 'हे' पुरस्कार

68 व्या फिल्मफेअरमध्ये आलियाच्या 'गंगूबाई काठियावाडी'ला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. सोबतच सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट डायलॉग, सर्वोत्कृष्ट कॉस्ट्यूम डिझाइन, सर्वोत्कृष्ट कोरियोग्राफी, सर्वोत्कृष्ट सिनेमेटोग्राफी हा देखील पुरस्कार मिळाला आहे.

दरम्यान, 2022 मध्ये प्रदर्शित झालेला 'गंगूबाई काठियावाडी' हा चित्रपट माफीया क्वीन गंगूबाईच्या जीवनावर आधारित आहे. या चित्रपटात आलियाने मुख्य भूमिका साकारली होती. तसेच संजय लीला भन्साळी यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं.



# तू फुलासारखी सुंदर....


हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या एका लूकमुळे चांगलीच चर्चेत आली आहे. सई नेहमी सोशल मीडियावर तिच्या वेगवेगळ्या लूकचे फोटो शेअर करत असते. याच फोटोमुळे ती नेहमी चर्चेत असते. नुकत्याच पार पडलेल्या झी चित्रगौरव 2023 साठी सईने एक सुंदर लूक केला होता. ज्याचे फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. सईच्या या फोटोवर सईचे चाहते अनेक कमेंट्स करत आहेत. मराठमोळी अभिनेत्री सई ताम्हणकर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या एका लूकमुळे चांगलीच चर्चेत आली आहे. सई नेहमी सोशल मीडियावर तिच्या वेगवेगळ्या लूकचे फोटो शेअर करत असते.नुकत्याच पार पडलेल्या झी चित्रगौरव 2023 साठी सईने एक सुंदर लूक केला होता. ज्याचे फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. सईच्या या फोटोवर सईचे चाहते अनेक कमेंट्स करत आहे



# 'मी प्रेमात नेहमीच..'

बॉलीवूड अभिनेता सलमान खाननं आपल्या रिलेशनशीप स्टेटसवर मोठा खुलासा केला आहे. सलमान खान काही दिवसांपूर्वी 'आप की अदालत' कार्यक्रमात पोहोचला होता. 'आप की अदालत' मध्ये जेव्हा शो चे होस्ट रजत शर्मा यांनी भाईजानला त्याच्या रिलेशन शीप स्टेटसविषयी विचारलं तेव्हा सलमान खाननं कोणतीही मजा मस्करी न करता अगदी स्पष्ट शब्दात उत्तर दिलं. अभिनेत्याचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे.मेकर्सनी युट्यूबवर 'आप की अदालत' या कार्यक्रमाचा एक टीझर प्रोमो रिलीज केला आहे. प्रोमोच्या सुरुवातीला सलमान खान आपल्या अनोख्या अंदाजात एंट्री करताना दिसत आहे. जसं सलमान खान आरोपीच्या पिंजऱ्यात गेला तसं रजत शर्मा यांनी त्याला 'किसी का भाई किसी की जान' सिनेमाच्या ट्रेलर लॉंच वेळी त्यानं केलेल्या 'मूव्ह ऑन' कमेंटवर प्रश्न केला.

सलमान हसत म्हणाला,"प्रेमाच्या बाबतीत मी कमनशिबी आहे सर". मग रजत शर्मा यांनी विचारलं,'तर आजकाल कोण आहे तुझी जान?तू कोणाशी कमिटमेंट केलीयस?'



सलमान म्हणाला,''मी फक्त आजकाल भाईच आहे. माझं ज्यांच्यावर प्रेम होतं ,ज्यांना मला जान बनवायचं होतं ते आजकाल मला 'भाई' म्हणून बोलावत आहेत..काय करू?"आता हे काही पहिल्यांदा घडत नाही जिथे सलमान खान 'आप की अदालत' मध्ये आला आहे. याआधी देखील २०१२ मध्ये आपल्या 'दबंग' सिनेमाच्या प्रमोशन दरम्यान सलमान शो मध्ये दिसला होता. तर यावेळी सलमान 'किसी का भाई किसी की जान' सिनेमाच्या प्रमोशन दरम्यान दिसला. सलमान आणि पूजा हेगडेचा हा सिनेमा सध्या सिनेमागृहात चाहत्यांचे मनोरंजन करत आहे. या सिनेमानं आतापर्यंत बॉक्सऑफिसवर ९०.१५ करोडची कमाई केली .

# केकेआर संघाला मोठा धक्का!

## आयपीएलच्या 16व्या हंगामातून ‘या’ खेळाडूने घेतली माघार

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कोलकाता नाईट रायडर्सचा यष्टिरक्षक लिटन दासने हंगामाच्या मध्यभागी संघ सोडण्याचा निर्णय घेतला आहे. तो २८ एप्रिल रोजी बांगलादेशला परतला. कौटुंबिक कारणामुळे लिटन दासने हा निर्णय घेतला आहे. आता तो या मोसमातील पुढील सामन्यांमध्ये खेळणार की नाही हे स्पष्ट झालेले नाही. केकेआर संघ व्यवस्थापनाने या वृत्ताला दुजोरा दिला असून या मोसमात त्याच्या पुढील खेळाबाबत सध्या कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.**



**लिटन दास बांगलादेशला परतला –**

केकेआरकडून अधिकृत निवेदन जारी करताना असे म्हटले आहे की, "लिटन दास बांगलादेशला त्याच्या कुटुंबाला आलेल्या वैद्यकीय समस्येमुळे परतला आहे. आम्ही त्याला आणि त्याच्या कुटुंबाला या संकटकाळातून बाहेर पडण्यासाठी शुभेच्छा देतो." लिटन दासच्या जाण्यानंतर केकेआर संघात केवळ बांगलादेशचा एकच खेळाडू उरला आहे, तो म्हणजे वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमान. यापूर्वी बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू शकिब अल हसनने आयपीएलमधून आपले नाव मागे घेतले होते.

**फक्त एकाच सामन्यात खेळण्याची संधी मिळाली –**

लीग सुरू झाल्यानंतर लिटन दास आयपीएल २०२३ मध्ये केकेआरमध्ये सामील झाला. कारण स्पर्धा सुरू झाली तेव्हा तो बांगलादेशसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत होता. संघात सामील झाल्यानंतर, त्याला अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध केकेआरच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी देण्यात आली. लिटन दासने या सामन्यात खराब फलंदाजी केली आणि मुकेश कुमारच्या चेंडूवर चुकीचा पुल शॉट खेळून तो अवघ्या 4 धावांवर बाद झाला. एवढेच नाही तर या सामन्यात त्याची यष्टिरक्षणही अत्यंत खराब होते. त्याने दिल्लीचे खेळाडू अक्षर पटेल आणि ललित यादव यांना स्टंपिंग करण्याची संधी गमावली होती.

त्या सामन्यात ललित यादव आणि अक्षर पटेल यांच्या शानदार फलंदाजीमुळे दिल्ली कॅपिटल्सने केकेआर विरुद्ध विजय मिळवला. जो सलग पाच पराभवानंतर दिल्लीचा हा पहिला विजय ठरला. दुसरीकडे, केकेआरबद्दल बोलायचे झाले तर, आरसीबीला पराभूत करण्यापूर्वी या संघाने सलग चार सामने गमावले होते आणि आता हा संघ या लीगमध्ये ६ गुणांसह सातव्या क्रमांकावर आहे.

### लिटन दासची टी-20 कारकीर्द

**लिटन दासने आपल्या कारकिर्दीत १८० टी-२० सामन्यांमध्ये ४०५५ धावा केल्या आहेत, तसेच यष्टिरक्षक म्हणून त्याने ९० झेल आणि २६ स्टंपिंग केले आहेत. त्याला केकेआरने प्रथमच आयपीएलमध्ये ५० लाखांच्या मूळ किमतीत खरेदी केले होते. या मोसमात तो केकेआरसाठी फक्त एकच सामना खेळू शकला.**

---

# चार फलंदाजांना बाद करण्यात ठाकूरला मिळालं ‘यश’

## लखनऊचा पंजाबवर दणदणीत विजय

। अस्ताना ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या १६ व्या हंगामातील ३८ वा सामना लखनऊ सुपर जायंट्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात मोहालीच्या बिंद्रा स्टेडियमवर रंगला. पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या लखनऊच्या फलंदाजांनी पंजाबच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला.** केली मायर्स, मार्कल स्टॉयनिस यांच्या वादळी अर्धशतकाच्या जोरावर लखनऊने २० षटकात ५ विकेट्स गमावत २५७ धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर २५८ धावांचं लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या पंजाब किंग्जच्या फलंदाजांची लखनऊच्या गोलंदाजांनी दमछाक केली.लखनऊचा गोलंदाज यश ठाकूरने चार विकेट्स घेतल्या. त्यामुळे पंजाब किंग्जचा आख्खा संघ १९.५ षटकात २०१ धावांवर गारद झाला. लखनऊने पंजाबवर दणदणीत विजय मिळवून गुणतालिकेत वरचा टप्पा गाठला आहे. पंजाब किंग्जसाठी सलामीला उतरलेल्या कर्णधार शिखर धवनला स्वस्तात माघारी जावं लागलं. मार्कस स्टॉयनिसने शिखर धवनला झेलबाद केलं. धवन फक्त एक धाव करून तंबूत परतला. त्यानंतर प्रभसिमरन सिंगला



लखनऊचा गोलंदाज नवीन उल हकने ९ धावांवर बाद केलं. त्यानंतर अर्थव तायडेनं चौफेर फटकेबाजी करत लखनऊच्या गोलंदाजांच्या नाकीनऊ आणलं. परंतु, तायडे ६६ धावांवर असताना रवी बिष्णोईनं त्याला झेलबाद केलं आणि पंजाबला मोठा धक्का बसला. त्यानंतर सिकंदर रजा यश ठाकूरच्या गोलंदाजीवर ३६ धावांवर असताना बाद झाला. त्यानंतर रवी बिष्णोईने लियाम लिविंगस्टोनला २३ धावांवर बाद केलं. नवीन उल हकने सॅम करनला २१ धावांवर बाद केलं. त्यानंतर रबाडाला बाद करून नवीनने तीन विकेट्स घेण्याची कामगिरी केली. यश ठाकूरनेही चार विकेट्स घेतल्या. पंजाब किंग्जसाठी कगिसो रबाडाने अप्रतिम गोलंदाजी केली.

---

# मार्कस-मायर्सने ‘केली’ गोलंदाजांची धुलाई

अस्ताना ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएलच्या १६ व्या हंगामातील ३८ वा सामना लखनऊ सुपर जायंट्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात मोहालीच्या बिंद्रा स्टेडियमवर होत आहे. पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या लखनऊच्या फलंदाजांनी पंजाबच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. सलामीला मैदानात उतरलेला लखनऊचा कर्णधार के एल राहुल कगिसे रबाडाच्या वेगवान माऱ्यावर १२ धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर मात्र मैदानात केली मायर्सचं वादळ आलं अन् लखनऊच्या धावसंख्येची गती वाढली. परंतु, रबाडाने पुन्हा एकदा भेदक मारा करून लखनऊचा धडाकेबाज फलंदाज मायर्सला ५४ धावांवर असताना बाद केलं आणि लखनऊला मोठा धक्का दिला. त्यानंतर मार्कस स्टॉयनिस,



आयुष बदोनी आणि निकोल पूरनने पंजाबच्या गोलंदाजांची धुलाई केली. या धावांच्या जोरावर लखनऊने २० षटकांत २५७ धावा कुटल्या. त्यामुळे पंजाब किंग्जला विजयासाठी २५८ धावांचं लक्ष्य गाठावं लागणार आहे.

पंजाब किंग्जसाठी कगिसो रबाडाने अप्रतिम गोलंदाजी केली. सुरुवातीच्या षटकांमध्येच राहुलला बाद करत पहिली विकेट घेतली. त्यानंतर आक्रमक फलंदाजी करणाऱ्या केली मायर्सला रबाडाने पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. मात्र, आयुष बदोनी आणि मार्कस स्टॉयनिसने अप्रतिम फलंदाजी करत धावांचा आलेख चढता ठेवला.